# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAANS

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXIII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, JANUARY 2021 | NO. 1


**पवित्र शास्त्र**

कृपया हा शास्त्रभाग पाठ करा

**प्रभुची स्तुती असो**

**यशया ४१:११-१७**

११) पाहा, जे तुजवर क्षुब्ध झाले ते लज्जित व फजीत होतील, तुजशी झुंजणारे शुन्यवत व नष्ट होतील.

१२) तुजशी लढणाऱ्या तुं धुंडालिशील पण ते तुला सांपडा वयाचे नाहीत, तुजशी युध्द करणाऱ्यांचा नायनाट होईल.

१३) कारण मी परमेश्वर तुझा देव तुझा उचवा हात धरून म्हणत आहे की, भिऊ नको, मी तुझे साहय्य करितो.

१४) हे कीटका, याकोबा, इस्त्राएलचे लोकहो, भिऊ नका, असे परमेश्वर म्हणतो, मी तुझे साहाय्य करितो, इस्त्राएलाचा पवित्र, प्रभु तुझा उध्दारकर्ता आहे.

१५) पाहा, मी तुझे तीक्ष्ण नवीन व दुधारी असे मळणीचे आऊन बनवीत आहे. तुं डोंगर मळून त्यांचा चुराडा करसील व टेकड्यांचा भुसा करिशील.

१६) तुं त्यांस उफलशील, वारा त्यांस उडवून टाकील, वावटळ त्यांस उधळून देईल, आणि तुं परमेश्वराच्या ठायी उल्लास पावशील, इस्त्राएलाच्या पवित्र प्रभुचा अभियान धरिशील.

१७) दीन व दरिद्री पाणी शोधितात पण ते कोंठेच नाही, त्यांची जीभ तहानेन कोरडी पडली आहे. त्यांची विनंती मी परमेश्वर ऐकेन, मी इस्त्राएलांचा देव त्यांचा त्याग करणार नाही.

# राष्ट्राला प्रभु परमेश्वराची साक्ष प्रभु

**पास्टर डेविड बिलकरसन**

**"सर्व राष्टांस साक्ष व्हावी म्हणून राज्याची ही सुवार्ता सर्व जगात गाजवितील. तेव्हा शेवट होईल."** (मत्तय २४:१४)

मंडळयांमध्ये आज अनेक लोक ख्रिस्ताच्या द्वितीय आगमना विषयीच्या पवित्र शास्त्रात नमुद करण्यात आलेली चिन्हे वाचून त्याचे येणे जवळ आले आहे असे ठरविण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही चिन्हे आपल्याला विशिष्ट घटनांमध्ये पहावयास मिळतात. उदा. यहुदी लोकांचे इस्त्राएल मध्ये परतणे. तरी देखील येशू ख्रिस्त त्याच्या द्वितीय आगमनाबद्दल त्यांच्या एका विधानात स्पष्टपणे सांगत आहे. ते विधानवरील वचनात समाविष्ट आहे. सर्व राष्ट्रांस साक्ष व्हावी म्हणून सुवार्ता गाजविली गेल्या शिवाय शेवट होणार नाही.

साक्षी विषयी येशू या वचनात जो शब्द वापरत आहे. ईब्री भाषेत तोच शब्द "साक्षी" (testimony) करिता उपयोगात आलेला आहे. त्याचा अक्षरश: अर्थ, "वस्तुस्थिती बद्दल पुरवा" ख्रिस्त येथे केवळ सुवार्ता संदेश देण्याविषयी बोलत नाही, तर ती एक साक्ष या रूपाने सादर करण्या विषयी बोलत आहे. थोडक्यात तो म्हणतो, आपण जी सुवार्ता गाजवितो सांगतो, ती तेव्हाच परिणाम कारक ठरते, जेव्हातीला तिच्या सत्यते विषयीच्या जीवनाची साक्षीची जोड असते.

तुम्हाला कदाचीत वाटत असेल अमेरिका देश हजारो इव्हॅन्जेलिकल मंडळ्यांनी भरलेला देश असल्यामुळे तेथे सुवार्ते संबंधी भक्कम साक्ष असेल. केवळ दक्षिणेकडील एका मोठ्या शहरातच २००० पेक्षा अधिक इव्हॅन्जेलीकल मंडळया आहेत, ज्यात एका मंडळीत १५,००० पेक्षा अधीक सभासद आहेत.

परंतु अशा अनेक मंडळयांनी ख्रिस्ताच्या खऱ्या सुवार्ते विषयी तडजोड केलेली आहे. आणि त्यामधील अनेक तरूण लैगिक स्वतंत्रतेचे जीवन जगत आहेत. तुम्ही प्रश्न कराल, हे कसे होऊ

*(पान ३ वर .....)*

**घोषणा**

कृपया याची नोंद घ्यावी, की आता एको ऑफ हिज कॉल मासिक मणीपुरी या १७ व्या भाषेत प्रसिध्द करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. मासिकांचे सहसंपादक म्हणून रेव्ह डॉ. रिशीकांत सोरोखाईबम यांनी जबाबदारी स्विकारली आहे.

# आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

मासिक प्रकाशन - इंग्रजी,तमीळ,मल्यालम,तेलगु,हिन्दी,मराठी,कन्नड,बंगाली,गुजराती,उरीया,नेपाली,आसामी,पंजाबी,उर्दु सिंहाला आणि अफ्रिकन






**"....... तुं भरपूर पाणी दिलेल्या मळयाप्रमाणे होशील. पाणी कधी न आटणाऱ्या झऱ्याप्रमाणे होशील "**
**(यशया ५८:११)**

प्रभु मधील माझ्या अति प्रिय बंधुनो आणि बहिणींनो,

आपल्या प्रिय प्रभु आणि तारणाऱ्या येशु ख्रिस्ताच्या अतिउदान्त अशा नामात तुम्हा सर्वांना शुभेच्छा देत आहोत.

तुम्हा सर्वांसाठी हे २०२१ चे नुतन वर्ष आशिर्वादीत आणि भरभराटीचे जावे अशि सदिच्छा व्यक्त करीत आहोत. आपला अभ्युत तारणारा जो तुमच्या जीवनात २०२० या वर्षभरात प्रवास करीत होता. तो या नुतन वर्षात देखील तुमच्यासह प्रवास करीत राहणार आहे. "ज्याने तुम्हांस बोलाविले, तो देव विश्वसनीय आहे." (१ करिथ १:९)

त्यामुळे त्याची स्तुती करणे, आणि संपुर्ण ह्रदयाने त्याची सेवा करणे ही आपली जबाबदारी आहे. "मी आपल्यासाठी निर्माण केलेले लोक माझे स्तब्त करितील." (यशया ४३ : २१)

महामारीमुळे उभ्दवलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या अडचणीत देवाने आपल्या जीवांचे रक्षण केले आहे. त्यामुळे आपला त्यांचे आभारी राहावयाचे आहे. कृतज्ञ राहवयाचे आहे. प्रभु त्याच्या कृपेने आमच्या गरजा पुरवित आहे. नुकत्याच संपलेल्या वर्षात त्याने त्याच्या राज्याच्या वाढीकरिता नवीन सेवा सुरूवात करण्यास मदत केली. देव कृपेने आम्ही मंडळीती हायस्कूल, बायबल कॉलेज अशा आमच्या सेवा (छोट्या प्रमाणात का होईना सुरू ठेवू शकलो.) सरकारच्या सर्व नियमावलीचे पालन करून

देवाने आम्हांस एको ऑफ हीज कॉल चे मणीपुरी या १७ व्या भाषेतील मासिक प्रसिध्द करणे शक्य होऊ दिले. मणीपुर हे राज्य भारताच्या उत्तर पुर्व प्रदेशातील राज्य आहे. आमच्या सेवेद्वारे मणीपुरी भाषेतील लोकांच्या पर्यंत मासिकाद्वारे शुभवर्तमान नेण्याकरिता सहसंपादकाची जबाबदारी स्विकारण्यास रेव्ह डॉ. रिषीकांत सोरोखैबाम पुढे आले आहेत. त्यांच्या करिता आम्ही देवाचे आभार मानीत आहोत. आम्ही एको ऑफ हीज कॉल च्या कुटूंबात त्यांचे कुटुबांसहित स्वागत करीत आहोत.

सेवेच्या सुरूवातीच्या दिवसांत जेव्हा देवाने आम्हांस एको ऑफ हिज कॉल मासिक प्रसिध्द करण्यास प्रेरित केले, त्यावेळेस सरकार कडून आम्हांस ते पुढील चार भाषांमध्ये प्रसिध्द करण्याची परवानगी दिली.

काश्मिरी
सिंधी
कोंकणी आणि
संस्कृत

परंतु निधीची कमतरता आणि इतर काही अडचणींमुळे आम्हांला मासिक प्रसिध्द करणे शक्य झाले नाही. आता आम्हांस आत्म्यात असे वाटत आहे की, वरील चार भाषांमध्ये मासिक प्रसिध्द करण्याच्या शक्यतांचा शोध घ्यावा, ज्यामुळे भारतातील बहुतेक सर्व भाषेतील लोकांकडे आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या येशु ख्रिस्तांचे शुभवर्तमान घेऊन जाता येईल.

**CHIEF EDITORS**
Pastor S. Sam Selva Raj
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.
**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager
**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M. Phil., B.Ed.
**Head Qrs. CO-ORDINATORS**
Bro. John Rodrigues
Sis. E. Daisy Rani
**ADVISORY BOARD**
Adv. Jose Abraham
Adv. N. Balaji, B.Com., B.L.
Dr. S. Rabinder Boaz, M.S.
Er. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM)
Aud. K. Puratchivendan, M.Com., B.L.
Bro. Rajeswaran Samuel, B.Com.

**PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
**Echo of His Call Printers**
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
**Phone :** (+ 91- 44) 2852 8282
2852 9293, 2854 7766
**Email :** sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
**Websites :**
www.echoofhiscall.org
www.echoofhiscall.com

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners Village English High School Crusades 100 Prayer Warriors Community Development

या दर्शनाच्या पूर्तते करीता, सर्वात प्रथम या महान अशा प्रयत्नांसाठी समर्पित अशा आमच्या सोबत हातात हात मिळवून प्रार्थना करण्यास तयार असलेल्या विश्वासु आणि समर्पित लोकांची गरज आहे.

तुम्ही अनेक वर्षे मासिकांचे वाचक, प्रार्थना योध्दे आणि एको ऑफ हिज कॉल सेवेचे आधार स्तंभ राहिले आहात, त्यामुळे या संबंधात तुमच्या सहकार्याची आणि दृष्टिकोनाची, सुचनांची अपेक्षा करीत आहोत. त्यामुळे या भाषिक लोकांपर्यंत शुभवर्तमान घेऊन जाण्यास मदत होईल.

या सर्व शुभवर्तमान न पोहचलेल्या समाजापर्यंत पोहचणे जरी अवघड आहे, तरी देखील या जगातील शेवटच्या व्यक्ति पर्यंत ने जो पर्यंत पोहचत नाही आणि त्याला/तिला प्रभु येशू ख्रिस्त हा त्याचा/तिचा उध्दारक (तारणारा) आणि देव आहे. हे कळत नाही. तो पर्यंत या दर्शनाची तीव्रता महत्व कमी होऊ देऊ नये. "परमेश्वराचे असे म्हणणे आहे की, तुम्ही मला ओळखावे, मजवर भाव ठेवावा व मी तोच आहे, माझ्यापुर्वी कोणी देव नव्हता व माझ्या नंतर ही कोणी होणे नाही हे तुम्हांला समजावे म्हणून तुम्ही माझे साक्षी आहा, तु माझा निवडलेला सेवक आहेस." मीच परमेश्वर आहे. माझ्या शिवाय कोणी त्राता नाही. मीच तारण विदित केले, प्राप्त करून दिले व समजाविले. तुमच्यामध्ये कोणी अन्य देव नव्हता. म्हणून तुम्ही माझे साक्षी आहा व मीच तो आहे. माझ्या हातांतुन कोणाला सोडवून घेता येणार नाही. मी करितो ते कोणाच्याने पालटवणार?

परमेश्वर तुमचा उध्दार करणारा, इस्त्राएलाचा पवित्र प्रभु असे म्हणतो, तुम्हासाठी मी बाबेलास निरोप पाठविला आहे. तेथील सर्व स्वास्थ्यांस त्यांच्या अभिमानास्पद जहाजात बसुन पळावयास लावीन. मी परमेश्वर तुमचा पवित्र प्रभु आहे. मी इस्त्राएलचा उत्पन्नकर्ता (तुमचा राजा आहे. जो समुद्रात मार्ग, प्रचंड प्रवाहात वाट करितो." (यशहा ४३:१०-१६)

या पत्राबद्दलच्या तुमच्या अभिप्रायाची वाट पहात आहोत. देव या नुतन वर्षात तुम्हाला अधिकाधिक आशिर्वाद देवो, आणि नवीन जोमाने, शक्तीने, शहाणपणाने आणि दिर्घायुष्याने मार्गक्रमण करण्यास सहाय्य करो हीच तुमच्या करिता आमची प्रार्थना आहे.

तुमच्या द्वारा

**पास्टर सॅम. एस. सेल्वाराज**

---

*(पान १ वरून .....)*

शकते? सत्य हे आहे, की जरी या मोठ्या मंडळ्यांमधून सुवार्ता संदेश दिले जात असेल. तरी लोकांच्या जीवनात ख्रिस्ताच्या प्रभुत्वाला आधार देणारी साक्ष अतिशय कमी प्रमाणात आहे ते शहरासाठी किंवा देशासाठी खरी साक्ष नाहीत.

अर्थातच त्याला अपवाद देखील आहेत. एका विशिष्ट अशा अशा शहरात मला ठाऊक आहे की, मुठभर असे काही तरूण सेवक(पाळक) ज्यांनी पुष्कळसा वेळ (प्रभुच्या समोर) पालथे पडून घालविण्यास सुरवात केलेली आहे. ते संदेश देतात, तो सामर्थ्याने भरलेला आणि अधिकारयुक्त असा देतात, त्यांच्या संदेशाला ख्रिस्तीबरोबरच्या त्यांच्या जवळीकीची आणि पवित्रतेच्या जीवनाची आधाराची साक्ष असते. आणि त्याचा परिणाम त्यांना त्यांच्या मंडळीमध्ये दिसावयास सुरूवात झाली आहे.

मला एक बॅप्टीस्ट मिशनचे पाळक ठाऊक आहेत. ज्यांनी एक प्रशस्त असे प्रार्थना गृह बांधण्याचे ठरविले. त्यांच्या मंडळीची वाढफारच जलद गतीने होत होती. आणि त्यांनी त्या वाढीच्या गतीचा अभ्यास सुरू केला. परंतु त्यांच्या पत्नीला प्रार्थना करण्याची आणि देवाची इच्छा जाणण्याची प्रेरणा मिळाली, आणि त्यानंतर लवकरच पाळकांनी देखील तेच करण्यास सुरवात केली आणि त्यांनी त्यांच्या प्रचंड मोठ्या सभासद संख्ये स्वप्न सोडून दिले आणि दिलेल्या संदेशाप्रमाणे आचरण करण्यास सुरवात करून एक साक्ष तयार केली.

लवकरच देण्यात येणाऱ्या संदेशासाठी पालकांनी त्यांच्या प्रार्थना गृहाच्या मंदिराच्या बाहेर एक मोठा पडदा लावला आणि त्यांनी मंडळीला सांगितले. "देवाचाआत्मा मजक्षीया मंडळीच्या पातका विषयी बोलत आहे, आणि आज आपण ती सर्व त्या पडद्यावर आपल्या डोळ्यांनी पाहणार आहोत."

त्यानंतर पाळकांनी एका मागून एक पापे पडद्यावर दाखविण्यास सुरवात केली. अशी विवाहाच्या अगोदरचे लैगिक संबंध, व्याभिचार मद्य प्राशन, मादक पदार्थांचे सेवन, लैगिंक शोषण, लैगिंक भावना उदित्र करणारे चित्रे त्यानंतर त्यांनी संदेशास सुरवात केली. "आपण आताच भव्य मंदिरे बांधणार नाही. आपण इतर काही करण्यास सुरवात करण्या अगोदर सर्वप्रथम ख्रिस्ताचा निवास मंडप निटनिटका करण्याची गरज आहे. आपल्याला प्रथम हे शुभवर्तमान जगावयाचे आहे. आज देवाचा आत्मा मोठ्या सामर्थ्यानिशी त्या मंडळीत फिरत आहे." लोक मोठ्या संख्येने प्रभुकडे येऊन त्यांचे जीवन नीटनीटके करीत आहेत, कारण ते सुवार्तेचा संदेश त्याच्यामागे असलेल्या साक्षी सहित ऐकत आहेत.

मंडळी वाढ कशा प्रकारे करता येईल या विषयी कैशल्य शोधण्यास जगभर फिरणाऱ्या हजारो तरूण आणि वयस्कर अशा दोन्ही सेवकांविषयी मला आश्चर्य वाटते आणि मी गोंधळलेलो आहे. सध्या अनेक उपदेशक शिबीरे, अभ्यास वर्ग, परिषदयामध्ये उपस्थित होत आहेत. ज्यामध्ये त्यांना सेवेतील तरूण व्यवसायिक वक्त्यांद्वारे आणि मतांच्या द्वारे मोठ्या मंडळ्या कशा तयार कराव्यात हे दाखवितात. इतर काही पाळक संजीवन सभामध्ये गर्दी करतात या आशेने की त्यांच्या

---

**एको ऑफ हिज कॉल सेवा** कार्य मासिकाच्या वाचकांच्या वर्गणीद्वारे आणि तुमच्या सारख्या स्वेच्छादान देणाऱ्या प्रियजनांच्या पाठबळावर सुरू आहे. "संतोषाने देणारा देवाला आवडतो." (२करिंथ ९:७) पुर्ण खात्रीने - किंमत देऊन कोणत्याही आणि कशाही मार्गाने सारखे होऊन (१ करिंथ ९:२२)

-संपादक

*(पान ३ वरून .....)*

मंडळीवर पवित्र आत्म्यांचा वर्षाव कशा प्रकारे करता येईल. या संबंधी काहीतरी नवीन पध्दत शिकता येईल.

हल्ली मिशन संस्था पूर्वी कधी नव्हते एवढया अधीक प्रमाणात कर्मचारी बाहेर पाठवित आहेत. त्यांची एकत्रीत ओरड "आपल्याला मिशन क्षेत्रां मध्ये अधिक मनुष्य बळ हवे आहे." अशी झाली आहे. राष्ट्राला ख्रिस्ताकरिता जिकावयाचे असेल तर अधिक प्रशिक्षित स्त्री-पुरूषांची गरज आहे.

परंतु पाठविण्यात आलेल्यापैकी पुष्कळसे मिशनरी काही वर्षांच्या आतच परत माघारी येत आहेत. त्यांना मारहाण करून पिटाळून लावलेले असते, नाऊ मेद झालेले, आणि त्या परदेशातील दृष्ट शाक्तिंनी पराभुत झालेले असे असतात. कारण काय? त्यांनी गाजविलेल्या शुभवर्तमान संदेशांशी त्यांच्या जीवनाचा मेळ बसला नाही! त्यांनी परिसराविषयी माहिती करून घेतली नाही, किंवा ख्रिस्तांचे प्रभुत्व किंवा पवित्र आत्म्यांची परिपुर्णता या विषयी माहिती करून घेतली.

हे पाहा, राष्ट्राला ख्रिस्तासाठी स्पर्श करण्याकरिता कलांना युक्त्या किंवा कौशल्य यापेक्षा अधिका काही हवे असते. आपल्या जीवनाच्या प्रत्येक भागांवर जर ख्रिस्त विराजमान नसेल. तर आपल्या सर्व योजना व्यर्थ आहेत.

## ख्रिस्त विरोधक शक्ति अशा महान सामर्थ्यानिशी अधिकारावर येत असताना ही एक शोकांन्तिका आहे.

आज पर्यंतच्या इतिहासात क्षुब्ध असे दृष्ट आत्मे नरकातून इतक्या वेगाने आलेले दिसले नाहीत. राष्ट्र राष्ट्राच्या विरूध्द उठत असल्यामुळे जगात आराजक तेची स्थिती निर्माण झालेली आहे. आणि हे यामुळे घडत आहे, कारण सैतानाने विश्वासणाऱ्या संताच्या विरोधात त्याच्या दृष्ट टोळयांना मुक्त केले आहे. सोडले आहे.

असे असले तरी आपल्या या जगात जे काही घडते त्या मध्ये देव अनेपेक्षितरित्या किंवा अचानक अडकला जात नाही. प्रचंड अशा मादक पीडेचे, किंवा गर्भापाताच्या रक्तपाताचे त्याला आश्चर्य वाटत नाही. मग या दृष्टपणा आणि शोभा यांच्या समयावर त्याची काय प्रतिक्रिया आहे.? धर्मत्याग आणि वाढत्या सैतानी शक्तिच्या बर तो कोणता उपाय सुचवत आहे? अशा नाशाच्या किंवा विध्वंशाच्या समयी देव काय करील?

नेहमी प्रमाणेच त्याचे उत्तर असणार - नवीन मार्गाने येशु, ख्रिस्ताचा विजय पुढे आणण्याचा, देवाने नेहमीच त्याच्या तारणदायी आणि शुध्दिकरणाच्या सामर्थ्याची साक्ष बनतील अशा नवीन शेष स्त्री-पुरूषांना त्यार करून प्रतिक्रिया दिली आहे. जसे आज देखील ते खरे आहे. ख्रिस्त विरोधी कार्याच्या देखाव्यापुढे वेगळे केलेल्या जिवनात ख्रिस्त असलेले असून विजय मिळविलेले देवभक्त स्त्री आणि पुरषाची गट जो त्याच्या शासनाला आणि प्रभुत्वाला पुर्णपणे आधीन राहील.

## संपुर्ण बायबल मध्ये हा नमुना पाहावयास मिळतो.

इस्त्राएलच्या मिसर मधील परिस्थीतीचा विचार करा. देवाचे हे राष्ट्र सर्वत्र धर्मत्याग केलेल्या अविध सनिय अशा विध्वंसक स्थितीत होते. इस्त्राएल सैतानाच्या टाचेखाली घेतले आहे. दाबून टाकले आहे. त्यांना छळण्याकरिता राजकीय शक्तिना त्यांच्या विरूध्द कायदे करण्यास कुशलतेने हाताळत आहे. शत्रू पृथ्वीवर देवाच्या साक्षीची उपहास आणि टिंगल करीत होते.

इस्त्राएलच्या इतिहासात हे अंधकारमय समय होते आणि कालातराने लोक नाऊमेद झाले. त्यांचे आत्मिक अंधपतन होऊ लागले. मिसरच्या सुख तिला उपभोगाव्यात मुर्तिपुजा आणि विवाहाच्या अगोदरच्या लैगिंकतेत भरमसाठ वाढझाली. इस्त्राएलची अवस्था अगदी आशाहीन अशी झाली. राष्ट्राचा विश्वास हळू-हळू कमी होऊ लागला.

या वाढत्या अंधकाराच्या शक्तिला देवाची काय प्रतिक्रिया होती? त्याने आजुबाजुच्या साम्राज्यांना त्यांच्या विरूध्द चेतवीले काय? मिसरांत लोकांमध्ये यादवी युध्व पेटविले का? सुड घेण्यास देवदुत पाठविले का? नाही! देवाने असे काही केले नाही. त्यांच्याकडे एक वेगळीचं योजना होती. उलट त्याने एका व्यक्तिवर आपला हात ठेविला, मोशेला त्याने तयार केले.

मोशे हा प्रार्थना करणारा होता, सदैव देवाच्या सहवासात होता, प्रार्थनेने घेरलेला होता. त्याने मिसरच्या सर्व सुख-सैख्याला आणि त्यांच्या मोहाला नकार देवून पवित्र आत्म्याच्या नियमाच्या संपुर्ण अधीन कार्यक्रमही नव्हता. त्याने स्वत:च्या कर्तृत्वाचा त्याग केला, बाजुला सारले आणि त्यचा संपुर्ण पुरवठा आणि स्तोत जो महान "मी"आहे. त्याजवर अवलंबून राहीला. आणि तो देवाच्या पवित्र भूमीवर त्यांच्या पवित्रतेचा प्रत्यक्ष दर्शन घेऊन आला.

तेव्हा, इस्त्राएलच्या अंधकारमय इतिहासाच्या समयात, देवाचे लोक आता शत्रूच्या आधीन होणार की काय असे वाटत असताना, प्रभु परमेश्वराने त्या सर्वामधुन एक व्यक्ती जी साक्ष म्हणून कार्य करील तिला उभे केले. आणि या एका व्यक्तिने संपुर्ण राष्ट्राला बाहेर काढले देवाने ते सर्व एका व्यक्ति द्वारे केले.

## आपण हि योजना शमुबेलामध्ये मुर्त स्वरूपात पाहतो.

येथे आपण धर्म त्याग, दुरा चरण दृष्टता, आणि आत्मिक पतनाची दुसरी पातळी पहा तो. त्या वेळेस कराराचा कोश इस्त्राएल मधुन गेला होता. एली जो राष्ट्राचा महायाजक होता. तो आळशी आणि आत्मसंतुष्ट होता, आणि त्यांच्या पुत्रांनी महायाजकीतेला भ्रष्ट करू दिले. त्यांच्या पुढारपणात मंदिरात व्याभिचार आणि विवाहा अगोदरच्या लैगिंक संबंधात प्रचंड प्रमाणात वाढझाली. परंतु एली त्यांच्या सुखी जीवनाची सवय लागलेली होती. तो त्यांना थांबविण्याकरिता काही एक करीत नव्हता.

एका वेळी तर देवाने संपुर्ण धार्मिक व्यवस्थेवर "इखाबोद" (Ichabod) म्हणजे "देवाचा आत्मा निघुन गेला आहे." असे लिहिले, सैतानी शक्ति पुन: मोठया सामर्थ्यानिशी उभ्या राहिल्या होत्या आणि सामान्य डोळयांना देवाचे कार्य पुर्ववत स्थितीत येतो अशक्य झाले होते.

परंतु देवाकडे त्यासाठी एक व्यक्ति होती शमुवेल नावाचे एक छोटे बालक त्याच्या

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

# प्रार्थना विनंत्या

## १९ जानेवारी २०२१ ते १८ फेब्रुवारी २०२१

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

### स्तुति करिता मुद्दे :-

१९ जानेवारी :- आमची नुतन वर्षाची रात्रीची उपासना देवाने आशिर्वादीत केले.

२० जानेवारी :- मुख्य मंडळीतील डिसेंबर महिन्यातील सर्व कार्यक्रम देवाने आशिर्वादीत केले.

२१जानेवारी :- आमच्या मुद्रणालयात छापून १६ भाषांत मिशन क्षेत्रांमध्ये पाठविण्यात येत असलेले शुभवर्तमान साहित्य देव आशिर्वादीत करीत आहे.

२२ जानेवारी :- देवाने आम्हांस "मणीपुरी" भाषेमध्ये एको ऑफ हिज कॉल मासिक सुरू करण्यास मदत केली.

२३जानेवारी :- सेंट पॉलस, मॅट्रीक्युलेशन स्कूलचे सुरूवात केलेले ऑन लाईन वर्ग आशिर्वादीत केले.

२४ जानेवारी :- सेंट पॉलस, मॅट्रीक्युलेशन शाळेच्या शिक्षकांबद्दल देवाची स्तुति करू या.

२५ जानेवारी :- आमच्या पत्रव्यवहाराद्वारे अभ्यास करण्यात येत असलेल्या बायबलकोर आणि थियॉलॉजीकल अभ्यास क्रमाबद्दल स्तुति करू या.

२६ जानेवारी :- आमच्या सर्व सहसंपादकाबद्दल आणि त्यांच्या कुटुंबाकरिता स्तुति करूया.

२७ जानेवारी :- आणखीन काही भाषांमध्ये एको ऑफ हिज कॉल मासिक सुरू करण्याबद्दलच्या आमच्या दर्शनाबद्दल स्तुति करू या.

२८ जानेवारी :- आमच्या सर्व प्रार्थना विश्वासातील, आजीवन वर्गणीदार, महान सेवा कार्यातील, भागीदारांबद्दल आणि त्यांच्या कुटुंबाकरिता देवाची स्तुति करू या.

२९ जानेवारी :- बायबल कॉलेज सुरू झाल्याबद्दल स्तुति करू या.

३० जानेवारी :- सर्व मिशन क्षेत्रांच्या फेऱ्या देवाने आशिर्वादीत केल्या

३१ जानेवारी :- आमच्या सर्व राज्य स्वयंव्यकाबद्दल स्तुति करू या.

०१ फेब्रुवारी :- मागील महिन्यांतील सर्व कार्यक्रम आशिर्वादित झाल्याबद्दल.

०२ फेब्रुवारी :- देव आमचे वरिष्ठ पालक, पास्टर सॅम सेल्वराज आणि त्यांच्या कुटुंबाचे दृष्ट शक्ति पासुन रक्षण करीत आहे.

०३ फेब्रुवारी :- देव आमचे वरिष्ठ पालक, पास्टर सॅम सेल्वराज आणि त्यांच्या कुटुंबाचे दृष्ट शक्ति पासुन रक्षण करीत आहे.

### प्रार्थने करीती मुद्दे

०४ फेब्रुवारी :- देवाने एको ऑफ हिज कॉलच्या सेवाकार्याकरिता २०२१ या वर्षात सर्व निधी पुरवावा.

०५फेब्रुवारी :- २०२० या मागील वर्षभरात ज्या आमच्या मित्रांनी मिशन क्षेत्रांना भेटी दिल्या. त्यांना देवाने आशिर्वाद द्यावा.

०६ फेब्रुवारी :- देवाने २०२१ मध्ये तुम्हा सर्व मासिक वाचकांना आशिर्वाद द्यावा यासाठी प्रार्थना करू या.

०७ फेब्रुवारी :- इंग्रजी मासिकाचे सहसंपादक, बंधु एम्. पॉलराज यांच्या प्रकृति स्वास्थाकरिता प्रार्थना करू या.

०८ फेब्रुवारी :- आमच्या नव्याने सुरू होत असलेल्या मणीपुरी भाषेतील मासिकाचे सहसंपादक रेव्ह डॉ. रिक्षीकांता सोराखाईबाम यांच्यासाठी प्रार्थना करा.

०९ फेब्रुवारी :- अंमली पदार्थ सेवनाच्या बंधनातुन लोक मुक्त व्हावेत यासाठी प्रार्थना करा.

१० फेब्रुवारी :- दुर्गम भागात सेवा करित असलेल्या मिशनऱ्यांचे देवाने रक्षण करावे.

११ फेब्रुवारी :- उत्तर प्रदेशातील मिशनऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि दैवी मार्गदर्शनासाठी प्रार्थना करू या.

१२ फेब्रुवारी :- करोना चे सर्व देशांतुन उच्चांटन व्हावे यासाठी प्रार्थना करू या.

१३ फेब्रुवारी :- आमच्या शुभवर्तमान मुद्रणालयाला देवाच्या आशिर्वादाची गरज आहे.

१४ फेब्रुवारी :- सर्व पथांच्या मंडळ्यांतील विश्वासणाऱ्यांमध्ये प्रिती राखली जावी.

१५ फेब्रुवारी :- देवाने सर्व राष्ट्रांच्या सीमांवर शांती पाठवावी.

१६ फेब्रुवारी :- नवीन वर्षात देवाने आमच्या सर्व संस्था आणि कर्मचारी वर्गावर नव्याने अभिषेक पाठवावा.

१७ फेब्रुवारी :- जगभरातील राजकीय पक्ष आणि त्यांच्या पुढाऱ्यांनी देवाला ओळखावे.

१८ फेब्रुवारी :- देवाने आमच्या वरिष्ट पालक पास्टर सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटंबाचे रक्षण करीत रहावे.

*(पान ४ वरून .....)*

अवतीभोवती असलेले सेवक विवाह अगोदरच्या लैगिक संबंधात आणि खादाडपणात गुंतलेले असताना शमुवेल मात्र देवाची वाणी ऐकण्याचे शिकत होता. आणि जसा जसा तो अधीकाधीक देवाच्या जवळ गेला. पवित्र आत्म्याने त्याला भविष्याच्या शब्दाने (वचनाने) भरले, तो देवाच्या सामर्थ्याची जिवित साक्ष असा झाला.

वचनात सांगण्यात आले आहे की, शमुवेल वाढत गेला आणि त्याचा एकही शब्द व्यर्थ गेला नाही. तो नेहमी सामर्थ्याने आणि अधिकारामुळे ४० वर्षे इस्त्राएलच्या विरोधात कोणतेही राष्ट्र उभे राहू शकले नाही.

परंतु एकदा देवाने संपुर्ण जगताला साक्ष होण्यास केवळ एकाच मनुष्याला तयार केले. देवाला सैन्याची गरज नव्हती, मानवी संस्थेची गरज नव्हती. आणि नवीन अशा कशाचीही गरज नव्हती. त्याला हवी होती ती केवळ एक नितीमान व्यक्ति अशी व्यक्ति तिची सेवा त्याच्या (देवाच्या) पवित्र समर्पित होती.

## हाच नमुना आपल्याला नहेम्याच्या समयात देखील पहावयास मिळतो.

नेहम्याच्या दिवसात यरुशलेमच्या कोटाची दुरावस्था झालेली होती, शहरात सर्वत्र दगडांचा खच पडला होता आणि मंडळी आत्मिक जीवनात पुर्णतया पतन पावली होती, कोणीही साक्षीदार उरला नव्हता. इस्त्राएल राष्ट्राच्या सभोवताली असलेल्या दृष्ट शाक्तिंनी त्यांचा अतोनात छळ केला होता. ते हाती घेत असलेल्या प्रत्येक कामाची चेष्टा करित होते.

अशा नाशाच्या अवस्थेतील समयी देवाची काय प्रतिक्रिया होती? त्याने त्याच्या मदतीकरिता शूशान मधुन प्रशिक्षित सैन्य पाठविले का? त्याने प्रमुख शत्रुवर प्रहार करण्यास राजवाड्यातील पहारेकरी पाठविले काय? नाही, तर देवाने पुन: एकवार केवळ एक व्यक्ति नेहम्या त्याला उभे केले.

हा येथे अंत:करणात देवाचे ओझे असलेला मनुष्य होता. इस्त्राएलच्या परिस्थितीमुळे नेहम्या अतिशय दु:खी होता. त्यामुळे त्याने प्रार्थना करण्यात, उपवास व दु:ख करण्यात त्याचा वेळ घालविला. त्या बरोबर तो सतत देवाच्या वचनात शोध घेत होता, आणि भविष्य जाणून घेत आत्म्यात पुढे जात होता.

नेहम्या जरी अर्तहशस्त राजाचा प्यालेबदार होता, तो त्याच्या सभोवतालच्या सर्व दृष्टाचरणा पासुन दुर होता.इस्त्राएल मध्ये सर्व प्रकारचा विकास, मरणाधीनता आणि देवविरहीत स्थिती असताना त्याने देवा बरोबरोबर पवित्रतेत चालणे सोडले नाही. आणि ज्यांनी ज्यांनी त्यांचा उपदेश ऐकला ते सर्व आत्म्यात शुध्द झाले.

लवकरच देशात पवित्रतेचे संजीवन पसरले, “मग याजक व लेवी यांनी स्वर्तास शुचिर्भुत करून लोकांची वेशींची व कोटाची शुध्दि केली.” (नेहम्या १२.३०) सर्व दैहीक ते काढून टाकून देवाचे मंदिर देखील शुध्द करण्यात आले.

नेहम्याने कामकऱ्यांना मंदिरात असे सांगुन पाठविले कि मला मंदिरातील सर्व घाण स्वच्छ केलेली हवीआहे. मुर्ती पुजेशी आणि भोग विलासाशी संबंधीत असे काही आत ठेवू नका, सर्व बाहेर काढून जाळून टाका.”

प्रियांनो देवाची संजीवनाची हिच कल्पना आहे. ती म्हणजे आपल्या अंत:करणाच्या प्रत्येक कप्यातीक अशुध्द आणि आपवित्र करणाऱ्या सर्व गोष्टी झाडून टाकणे काढून टाकणे. अंत:करणात कोणतीही अंधकारमय जागा असू नये अशी त्याची इच्छा आहे.

मंदिराच्या बाबतीत तडजोड घडवून आणण्याचा आत्मिक अधीकार नेहम्याला कोठून प्राप्त झाला. राजाने तो दिला नाही. कोणत्याही मंडळीच्या बिशपांनी दिला नाही. पवित्र शास्त्राभ्यास शाळेतुन ते तो शिकला नाही.

नाही. नहेम्याला तो त्याला त्याच्या गुंडघ्यांवर येऊन मिलाप करून दु:खीत मनाने देवाची इच्छा जाणून घेण्याद्वारे प्राप्त झाला. आणि तो प्रार्थना करणारा मनुष्य असल्यामुळे तो देवाकडे संपुर्ण राष्ट्राच्या पातकांची कबूली देऊन प्रार्थना करू शकला, “तुझे सेवक इस्त्राएल लोक त्यांच्यासाठी मी तुझा दास या समयी रात्रदिवस प्रार्थना करीत आहे. आम्ही इस्त्राएल लोकांनी तुझ्याविरूध्द पातके केली आहेत. ती मी कबूल करितो. मी व माझ्या बापाच्या घराण्याने पातक केले आहे. आम्ही तुजसमोर अतिशय दुर्वतन केले आहे आणि ..... आज्ञा, नियम व निर्णय आम्ही पाळीले नाहीत.” (नेहम्या १:६-७)

## यहेज्केलाच्या समयात धर्मत्यांगाचे आणि आत्मिक पतनाचे धक्कादायक वर्णन आहे आणि अशा समयामध्ये देव त्याची साक्ष झाला.

यहेज्केलाच्या समयात इस्त्राएल लोक


### एको ऑफ हिज कॉलचे भागीदार

देव कृपेने **एको ऑफ हिज कॉल**चे विविध सेवाकार्य शक्य होत आहे. ते भागीदारांच्या निरनिराळ्या प्रकाराद्वारे प्राप्त होत असलेल्या सक्रीय सहभागामुळे

**१) प्रार्थना भागीदार:-** एको आफ हिज कॉल सेवा कार्याकरिता नियमित प्रार्थना करितात आणि विशेष प्रार्थना आयोजित करितात अशा व्यक्ति

**२) वर्गणी देणारे भागीदार -** एको ऑफ हिज कॉलच्या सर्व प्रकाशनांना त्यांच्या नियमित वार्षिक वर्गणीद्वारे उचलून धरणारे.

**३) आजीवन भागीदार -** रूपये २०००/- किंवा त्यापेक्षा अधीक रक्कम एकदा एकर कमी आधारा स्तब देणाऱ्या व्यक्ति.

**४) विश्वासाचे भागीदार -** एको ऑफ हिज कॉल च्या सेवा कार्यासाठी प्रति महा आर्थिक मदत पाठविणाऱ्या व्यक्ति.

**५) महान सेवा कार्याचे भागीदार -** सर्व मंडळ्या आणि मिशनच्या सहित, संस्थासहित कोणत्याही प्रकारचे पंथीय अडखळण न ठेविता देवाचे कार्यकरणाऱ्या व्यक्ति.

उद्देश :- ओझे वाहाणे (गलती ६:२), गरजा भागविणे (रोग १२:१३), प्रदिप्त करणे (२ निमथी १:६)

आपल्या देशाला देवाचे वचन देण्याकरिता आम्ही आपणांस या पैकी कोणत्याही एका आत्मिक सैन्यात येण्यास सहर्ष स्वागत करीत आहोत. देव तुम्हांस विपुल आशिर्वाद देईल.

**पास्टर एस. सॅम. सेल्वराज**

98412 71858 / 98410 71585

अपवित्र, विषयासक्त आणि गर्विष्ट होते. पुरूष शेजाऱ्याच्या पत्नीसोबत घृणास्पद वागणूक करीत होते. आणि त्याच्या सुनांना देखील भ्रष्ट करीत होते. एकेवेळी पवित्र असे संदेष्टये आत्मिक पतन होऊन, पैशाचे प्रेमी बनले होते आणि पवित्र आणि जगीक यांत भेद करणे सोडून दिले. राष्ट्रातील नेत पुढारी क्रुर लांडगे, अप्रमाणिक रित्या लाभ प्राप्त करणारे, रक्तपात करणारे, खोटे बोलणारे गरीबांना गांजणारे असे होते. हे सर्व आपल्या समयात घडत आहे. त्याशी साम्य असल्यासारखे वाटते.

अशा रीतीने इस्त्राएलास देवाच्या मार्गाचा विसर पडला, तेव्हा देव त्यांच्याबद्दल बोलला." इस्त्रायलचे घराणे मजकरिता गाळ झाले आहे! राष्ट्र इतके दुबळे, जगीक आणि शक्तिहिन झाले कि जगाच्या थट्टेचे कारण झाले. तो म्हणाला. "म्हणून मी तुला राष्ट्रांच्या निंदेस सर्व देशांच्या थट्टेस पात्र करीन." (यहेज्केल २२:४)

किती हे भावशुन्य आरोपपत्र! देव इस्त्राएलला बोलत होता, "तू माझ्या पवित्र वस्तुंस तुच्छ लेखिलेस स्वत:स पुर्णपणे वासनेस वाहून दिलेस, मी तुझी साक्ष काढून घेणार आहे."

या वेळेपर्यंत यहेज्केल वयोवृध्द झालेला होता.आणि मृत्यु पावणार होता. अशा वेळी मग देवाने ती परिस्तिती कशी हाताळली? त्याने यहेज्केलला सांगितले, "मी भूमीचा नाश करू नये, म्हणून तिंच्यातला कोणी तट बांधील कोणी मजसमोर देशासाठी तटाच्या खिंडीत उभा राहील की काय याची मी वाट पाहिली, पण कोणी मला आढळला नाही." (यहेज्केळ २२:३७)

याची कलाना करा - इस्त्राएलचे भवितव्य हे केवळ, एक नितीमान पुरूष ज्यावर देव खात्रीपुर्वक भरोसा ठेवू शकतो. असा सापडण्यावर अवलंबून होते. आणि देव यहेज्केलला बोलतो. "पण मला कोणी आढळला नाही. त्यामुळे त्यांजवर मी आपल्या क्रोधाचा वर्षाव करीन......" (यहेज्केल २२:३०-.३१)

देव यिर्मया सेदेष्टयाशी देखील हेच बोलला "यरूशलेमाच्या गल्लयांतुन इकडून तिकडे धावा व पाहून खातरी करून घ्या. की कोणी धर्माने वागणारा, सत्याची कास धरणारा सापडेल काय?" सापडल्यास मी त्याला क्षमा करीन." (यिर्मया ५:१) देवाने संदेष्टयाला सांगितले, "मला एक जरी, खिंडीत उभा राहिल असा मनुष्य सापडल्यास मी संपुर्ण राष्ट्राला क्षमा करीन. मला माझ्या इच्छेला संपुर्णपणे शरण येणारा, केवळ एक आत्मा हवा आहे."

प्रियांनो हल्ली मंडळयामध्ये जगा पर्यंत पोहचण्यासाठी अधिक निगडीत, समकालीन मार्ग मिळावा या करिता बबेलच्या गोंधळाचे रडणे ऐकू येत आहे. आणि विलक्षण असे नवनवीन कार्यक्रमाद्वारे प्रयत्न केले जात आहेत. माझ्या अनेक वर्षाच्या सेवेच्या काळात असे कार्यक्रम येतात आणि जातात असे माझ्या पहाण्यात आले आहे. ते केवळ देहाला संतुष्ट करणारे असतात. त्यांचा क्रुसाशी काही एक संबंध नसतो. कार्यक्रमाला आकर्षित झालेले आले तसेच रिकामे जीवन घेऊन आणि जग व त्याच्या वासने पासुन वेगळे करू शकणाऱ्या शुभवर्तमानास सादर न होता तसेच जातात. जग अशा कार्यक्रमाचा उपहास करते. आणि सर्व मुर्खता म्हणून त्याकडे पाहाते.

कोणताही सेवक किंवा कार्यक्रमाची हातभार लावणारा अशा प्रकारचा भुसा तयार करू शकतो. सैताना सारखे जीवन जगत असलेली व्यक्ती वरवर दिसणारा धार्मिक कार्यक्रम कसा काय अमलात आणू शकतो? खरे पाहिले तर फार मोठी अशी मंडळी उभारण्याकरिता तीक्ष्ण शुध्दि आणि सी.ई.ओ. चे कौशल्य याचीच कायती आवश्यकता असते. परंतु जर तुम्ही ते देवा त्याच्या नितिमत्तेशिवाय किंवा पवित्र ते शिवाय केले तर त्याच्या नसलेले शुभवर्तमान आहे. त्यामध्ये मुक्त करण्याचे सामर्थ्य नसणार.

मागील अनेक वर्षामध्ये माझ्या असे लक्षात आले आहे, ते म्हणजे उपदेशक आत्मिक जीवनात जीतका अधीक पतन पावतो, तो तितकया अधीक प्रमाणात करमणुक करणारे शुभवर्तमान आणि गर्दी ओढणारे आकर्षित करणारे. "नवीन कार्य," करण्याकडे ओढला जातो. आणि स्वत:च्या यशाचे मुल्यमापन तो संख्येवर व पैशांवर करण्यावर अवलंबून राहतो. अशा कार्याला साक्षीची जोड नसते ते दुसरे शुभवर्तमान आणि दुसरा येशू असे असतो.

देवाचे खरे भय असणाऱ्या पालकाला त्याच्या सेवेमध्ये एकच उदीष्ट असते. त्याच्या जीवनातील प्रत्येक भागांद्वारे प्रभु येशूला जो पर्यंत मुकुटमंडीत करित नाही. गौरवित नाही. तो पर्यंत जीवाला विश्रांती न घेणे आणि स्वत:स व त्याच्या कळपास पवित्र आत्म्याच्या नियमांच्या अधिपत्याखाली आणणे.!

**ज्या कोणा मुष्याच्या जीवनात शुभवर्तमान रक्षणाच्या सामर्थ्य करण्या विषयाची साक्ष आहे. तो सैतानाच्या क्रोधाचे मुख्य लक्ष्य बनतो.**

तुम्हाला, ख्रिस्ताच्या परिपर्णतेची भुके आणि तहान असेल सैतान तुमच्या विरूध्द युध्द जाहीर करील. त्याला तुमच्यात खऱ्या वचनबध्दतेचा, प्रार्थनेतील श्रमाचा, स्वनाशराचा पुरावा दिसतो, तेव्हा तो तुमच्या साक्षीचा नाशे करण्यास नरकातील सर्व शस्त्राच उपयोग करील का? ती साक्ष धर्मत्याग आणि विध्वंस याबद्दल देवाची साक्ष आहे.

दानिएलाच्या घटनेतील तप्त भट्टी संबंधीत हे आहे. सैतानाने बाबेमध्ये देवाच्या सामर्थ्याविषयीची शिल्लक राहिलेली. साक्षीचा नाश करण्याकरिता एक तपशीलवार योजना आखली. त्याचा कळस तप्त भट्टी, जी शुभवर्तमाना संबंधीत जीवंत सत्य पुर्णपणे ठार करावे. मारून टाकावे. म्हणून होती.

बाबेलमध्ये तीन देवभक्त तरूण सरकार दरबारी उच्च अधिकार पदावर होते. जे गाजविण्यात आलेल्या शुभवर्तमानचे दृष्य असे साक्षी होते. त्यांनी स्वत: बाबेलच्या विलासापासुन दुर ठेविले होते आणि त्या ऐवजी प्रार्थनेला जीवन समर्पित केले होते. हे तीन पुरूष काही संदेष्टये किंवा याजक नव्हते. तर अदिक्षित होते. ते मुर्तिपुजक समुदायामध्ये देवाशी प्रमाणीक राहिले आणि अंत:करण शुध्द राखीले.

अर्थातच, यामुळे सैतान क्रोधाने पेटला ,आण त्याने बाबेलच्या दृष्ट राजाच्या अंत:करणात प्रवेश केला. राजाने तात्काल एक प्रचंडमोठी सुवर्ण मुर्ति घडविली आणि जाहीर केले ही मुर्ति राज्याचा अधिकृत देव असुन सर्वांनी त्याची उपासना करावयाची आहे. त्यानंतर त्याने बाबेलच्या अधिकाराखाली असलेल्या सर्व राज्यांच्या अधिकारी आणि नोकरांना नवीन धर्माची ओळख व्हावी यासाठी फर्मान काढले.

सैतानाने राजाला विटांची एक प्रचंड भट्टी तयार करून ती पेटविण्यासाठी इच्छुक केले. यासाठी कि लोकांना ज्वाला दिसाव्या. मी तुम्हाला विचारतो सैतानाने असे करण्याचे काम कारण असावे? त्याला खात्री होती की बालेल मधील एक ही राज्यपाल, न्यायाधीश किंवा शेरिफ या नवीन हुकुमाला विरोध करणार नाही. त्यांना प्रवृत्त करण्याची भिती दाखविण्याची गरज नव्हती.

खरे तर ते मुक्या सारखे झाले असतील, विचार करीत असतील. " आपल्याकडे समृध्दि आहे, खाणे पिणे आहे, उत्तम जीवन आहे. मग उगाच जहाज खडकावर का आधळावयाचे ?" आणि हा नवीन धर्म उलट सोपा आहे. आपले झाले ते सर्व कोणाला सोडाविसे वाटणार?

तेव्हा या तप्त भट्टी मागचे काय कारण होते?

मोठया कुशलतेने त्या तीन तरूण आदिक्षितांचा नाश करण्याकरिता तयार केलेले ते सर्वस्वी सैतानाचे काम होते. त्याला बाबेल मध्ये उरलेली साक्ष पुर्णपणे नाश करावयाची होती.

राजाचे आणि संपुर्ण प्रशासनाचे मन दुषित करण्यापर्यंत सैतनाची मजली गेली. ती केवळ या तीन पुरूषां पर्यंत पोहचण्यासाठी त्याने परिस्थिती इतकी गंभीर आणि भयानक निर्माण केली होती, की कोणीही व्यक्ति स्वत:च्या मानवी शक्तिच्या बळावर तिला सामोरा जाऊ शकणार नाही. तो देवभक्त तरूण देखील, त्याचा चुरा चुरा झाल्या शिवाय,असे असताना देखील, पहिल्यांदा वाद्ये वाजल्यानंतर देखील त्या तरूणांनी दडवंत घातले नाही. सैतान ते पाहून संतापला ! त्यानंतर राजाच्या मुखातुन असे भयंकर वाईट शब्द निघाले." ..... माझ्या हातांतुने तुम्हांस सोडविल असा कोणता देव आहे?" (दानिएल ३:१५) " ...... भट्टी नेहमीपेक्षा सातपट तप्त करा" (दानिएल ३:१९)

आता सैतानाच्या देवाचे हे सेवक दृष्टि पथात किंवा टप्यात होते. त्यांना धमकावीत होतो, " तुम्ही स्वत:ला कोणा समजत आहात. कि मी तुमच्या पुढे मांडून ठेविलेल्या मृत्युपासुन स्वत:चा बचाव करू शकाल?

मी तुम्हाला खाली खेचून तुमची साक्ष संपुर्ण नाश करून टाकणार आहे!

आजकाल ज्या उष्णतेला आपणाला सामोरे जावे लागत आहे. तशी उष्णता आपल्या काही पिढ्यांच्या वेळी नव्हती. उदा. सैतानाने आपल्या काळातील तंत्रज्ञान, भुलवणुक भोग शक्ति, वासना आणि मोहपाश यांनी बिघडवून ताब्याते घेतली आहे. आपल्याला मोह पाशाच्या अशा तृप्त भट्टीला का सामोरे जावे लागत आहे.? वासना आणि लैंगिकता यांचा उपयोग काल्पनिक प्रकारच्या मालाच्या स्वार्था करिता का करण्यात येतो? इंटरनेटवर भिस्त दर्शन घडविणाऱ्या शेकडो वेबसाईट का आहेत.? या घाणीच्या पूराचे लक्ष्य कोण आहेत.?

निश्चितच दृष्ट समुदाय शास्त्र वाचना नुसार जो सैतानाचा लेकरू झालेलाच आहे. निधर्मि जग नाही. जे अगोदरच कुमार्गाला लागलेले आहे. यापैकी एकही सैतानाचे लक्ष्य नाही. त्याने विजयी जीवन जगत असलेल्या विश्वासणाऱ्याची अंत:करणे जाळयात ओढण्यात काही प्रमाणात प्रसार माध्यमांवर ताबा मिळविलेला आहे. त्याला शुभवर्तमानाची साक्ष दुबळी आणि नाश करावयाची आहे.!

सध्या, अनेक बिधासणाऱ्यांच्या जीवनात नेहमीपेक्षा सात वेळा अधीक तप्त करण्यात येत आहे. सैतानाने त्यांच्या घरात व्यवसायाच्या ठिकाणी आणि त्यांच्या नातेसंबंधात पुर्वी नव्हती. एवढी कडक परिस्थिती निर्माण केली आहे. आणि अनेक विश्वासात भक्कम असलेले ख्रिस्तीजन हे देवाला सोडून देत आहे. ते आता मदतीकरिता प्रार्थना करीत नाहीत. उलट असा विचार करतात. "माझी परीक्षा जीवंत रहाण्यास माझ्या शक्ति पलीकडेची आहे. भडक आहे."

देवाची स्तुती असो, या तीन तरूणांनी त्याची साक्ष राखली आणि सैतानाची योजना धुळीस मिळविले.

बाबेलच्या संपुर्ण देशाला त्याची उघड करण्यासाठी देवाने सैतानाची कारस्थानी योजना संधी मध्ये उलटवली. त्या तीन अदिक्षीत तरूणांनी मुर्तीला दंडवत न घातल्यामुळे देवाने त्यांना तप्त भट्टीतुन सोडविले आणि त्यांनी संपुर्ण देशाला प्रभु येशुला स्पष्टपणे प्रकट केले!

बाबेलच्या राजाने साक्ष दिली,"..... आपल्या अग्नीत तिघांजणांस बांधून टाकिले ना? तो म्हणाला पाहा! चार इसम अग्नीत मोकळे फिरत आहेत. असे मला दिसते. त्यांस काही एक इजा पोहचली नाही. चौथ्याचे स्वरूप तर एकाद्या देवपुत्रासारखे आहे." (दावीष्ल ३:२४-२५)

राजाने अचानक त्याचे अगोदरचे फर्मान रद्द करून असे नवीन फर्मान काढले." त्याकरिता मी फर्मावितो की सर्व लोक यापैकी जे कोणी शद्रख, मेशख व अबदेनगो यांच्या देवा विरूध्द काही बोलतील त्यांचे तुकडे तुकडे करण्यात येतील, कारण अशा प्रकारे सोडविण्यास समर्थ दुसरा कोणी देव नाही." (दानीएल ३:२९)

पाहा, हे असे घडले ते त्या तीन तरूणांच्या साक्षीमुळे जे देवावर प्रेम करणारे आणि विश्वासात स्वेच्छापूर्वक त्यांचा प्राण देण्यास तयार होते. राज्याच्या नियमात बद्दल घडवून आणण्यात हे तीन नम्र तरूण कारणीभुत होते.

होय, आर्थिक, शारीरीक, मानसिक, आत्मिक आणि इतर सर्व पाळल्यानंतर तप्त होणार आहे. परंतु देवाने अगोदरचे त्याचा हात वेगळे केलेल्या धार्मिक स्त्री-पुरूषांवर ठेविलेला आहे. आणि त्याची सुवार्ता एक साक्ष म्हणून गाजविली जाणार.

त्यानंतर प्रभु चे येणे होणार!

**तातडीची गरज**

आम्हांला **एको ऑफ हिज कॉल**च्या उर्दु मासिकाकरिता भाषांतर करणारी व्यक्ति हवी आहे. आम्ही दरमहा महनताना आणि इतर सर्व खर्च देऊ.

पास्टर एस्. सॅम. सेल्वराज
व्हॉटस ॲप आणि मोबाईल क्र.
**98412 71858 / 98410 71585**



## PIT TO PALACE

# खड्यातून महालापर्यंतची मालिका

(रेव्ह. सॅम सेल्वा राज यांच्या जीवनांतील अनुभव)

"जो कोणी बुध्दिमान् असेल त्याने ह्या गोष्टींकडे लक्ष पुरवावे" (स्तोत्र १०७:४३(अ))

# देवाची त्याच्या अवर्णनीय दानाबद्दल स्तुति करू या!

**बाप्तिस्म्याच्या टाकीची गोष्ट**

माझ्या सेवा कार्याच्या सुरवातीच्या काळात वेगवेगळ्या भाष्यांमध्ये शुभवर्तमान हस्तपत्रिका वाटण्याद्वारे, वैयक्ति भेटी, मंडळी कार्यक्रम, समाज उन्नति कार्यक्रम अशा माध्यमांद्वारे वेगवेगळया संस्कृतिच्या आणि भाषांमधील लोकांमध्ये कार्य करण्याची मला सवय होती. देवाने त्याच्या कृपेद्वारे मला फार मोठ्या संख्येने लोकांना बचनाद्वारे स्पर्श करण्यास आणि त्यांना बाप्तिस्मा देण्यास मदत केली. परंतु बाप्तिस्मा देण्याकरिता माझ्याकडे पाण्याची टाकी उपलब्ध नव्हती.

मी बाप्तिस्म्या करिता खाजगी पोहण्याच्या तलावांचा वापर करीत असे. प्रभु येशूचा तारणारा म्हणून स्विकार करून बाप्तिस्मा घेणाऱ्यांची संख्या वाढत राहिल्यामुळे पोहण्याच्या तलाव वापरण्यास मला मालकाने परवानगी नाकारली. त्यानंतर काही मंडळ्याच्या बाप्तिस्मा टाकीचा त्याची परवानगी घेऊन व त्याबद्दल त्यांना काही रक्कम देऊन बाप्तिस्मा देवू लागलो.

वाढत्या संख्येमुळे स्थानिक मंडळ्यासाठी देखील मी एक उपद्रवी व्यक्ति ठरू लागलो. सरते शेवटी मी एका स्थानिक मंडळीच्या वरिष्ट पाळकांची भेट घेतली. व त्यांच्या मंडळीच्या टाकीचा उपयोग करू देण्यासाठी विनंती केली. त्यांनी थोडे दिवस उपयोग करण्यास परवानगी दिली. परंतु अचानक एक दिवशी सकाळी मला फोन करून सांगितले.

बंधु सॅम देव तुमचा उपयोग शुभवर्तमान न पोहचलेल्या लोकांपर्यमत प्रभु येशुचे शुभ वर्तमान नेणयाकरितो आणि त्यांना बाप्तिस्मा देणयासाठी आमच्या टाकीचा उपयोग करित आहेत. त्या मला आनंद होत आहे. परंतु माझ्या असे निदर्शनास आले आहे की तुम्ही निरनिराळी पाश्वभुमी असलेल्या निरनिराळ्या लोकांना आणून त्यांना बाप्तिस्मा देव आहात. मला धोका पत्करावयाचा नाही. तेव्हा कृपया मला माफ करा. मला येथून पुढे तुम्हाला परवानगी देता येणार नाही.

पुढील काही महिने मी बाप्तिस्मा करू शकलो नाही. त्याबद्दल मी नाराज होतो. जे नवीन आत्मे प्रभुकडे येत होते. ते बाप्तिस्मा देण्याबद्दल आग्रह करीत होते. १९८० सालात, एके दिवशी ओझ्याने भरलेल्या अंत:करणाने मी प्रार्थना करू लागलो. पुढे प्रार्थनेकरिता मुखात शब्द नसल्यामुळे मी तसाच चटईवर पालथा पडून राहिलो. थोड्या वेळानंतर देवाच्या आत्म्याने माझी भेट घेतली व मी उठून देवाकडून महान अशा गोष्टीसाठी प्रार्थना करण्याकरिता उत्तेजन दिले. मी उठलो आणि प्रार्थना मंदिर बाप्तिस्माच्या टाकीसहित, कार्यालये, मुद्रणालय, निवास स्थान अशा सर्व गोष्टी समाविष्ट करता येतील. अशी इमारत मिळावी यासाठी प्रार्थना करू लागलो. देव मजशी स्पष्ट बोलला की मी मजजवळ असणारा सर्व पैसा आणि मालमत्ता सोडण्याची तयारी ठेवावी. देव मजशी बोलल्यानुसार मी मागचा पुढचा विचार न करिता माझ्याकडे होते ते सर्व सेवेकरिता देवून टाकले. जरी माझा वैयक्तिक हिस्सा (इमारत खरेदी करण्यात) कमी होता, तरी देखील ही सध्याची सेवाकार्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी असलेली इमारत खरेदी करण्यासाठी मला आशिर्वादीते केले. मालमत्ता ताब्यात मिळाल्या बरोबर माझे पहिले प्राधान्य बाप्तिस्मा करण्याची टाकी बांधणे होती. (जी सध्या आहे.) किती अभ्दूत असा आपला देव आहे !

प्रिय मित्रा देवाने तुला देखील एका विशिष्ट उद्देशासाठी निवडलेले आहे. तू स्वत:ला आणि तुझा देव, ज्याने तुला पाचारण केले. त्याला कमी लेखू नको. लेकरू जसे त्याच्या पित्याकडे जाते, तबदतच कोण त्याही प्रकारचा स्वार्थ आणि दुष्ट विचार मनात न बाळगता, त्याजकडे गेला, आणि त्याजपुढे तुझ्या समस्या आणि अडचणी मांडल्या, तर तुला (तुझ्या जीवनात) देवाचा अभ्युत हात दिसेल. तेव्हा विचार करण्यात वेळ दवडू नको. "यास्वत व तुम्ही आपल्या मनरूपी कंबरा बांधा आणि स्तबध राहून येशू ख्रिस्ताचे प्रकटीकरण होण्याच्या वेळी तुम्हांस प्राप्त होणाऱ्या कृपेवर पुर्ण आशा ठेवा." तुम्ही आज्ञांकित मुले व्हा आणि आज्ञानावस्थेतील आपल्या पुर्वीच्या वासनांप्रमाणे वागुं वर्तु नका. तर ज्याने तुम्हांस पाचारण केले. तो जसा पवित्र आहे. तसे तुम्ही ही सर्व प्रकारच्या आचरणांत पवित्र व्हा.

(१ पेज १:१३-१५)

## A Loving Request

As you all know we are hard-pressed to meet several needs like the salary of the staff, expenses for the purchase of paper and also the travel expenses. Generally we never ask others to meet our financial needs. But we request those who truly love this ministry to send your offerings through Money Orders, Cheque or Demand Draft, Phone Pay, NEFT or through any other methods and support us in this Ministry. The Lord will surely bless you. For details call: +91 98412 71858 / 98410 71858

**- Editor, Echo of His Call**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

# ECHO OF HIS CALL

**Monthly magazines in 16 languages, Bible Colleges, Postal Courses, Church Planting, Village English High School, Gospel Printing Press, Crusades, Seminars, Social Services, etc.**

**Annual Subscription : Rs. 100/- Life Subscription : Rs. 2000/-**

The multifarious activities of **Echo of His Call Ministry** is supported by the free-will offerings and donations of the God's Children like you. You may support **Echo of His Call** and its activities as the Lord leads you. We need your help to send forth the Gospel to the unreached people and plant Churches.

If you would like to receive **ECHO OF HIS CALL** magazines regularly, please write to us. Whenever you change your postal or e-mail addresses, please do inform us your old and new addresses.

**Echo of His Call** is available in 16 languages in our websites also. You can read it by going into the site as well as downloading it and get blessed.

Your letters, prayer requests and your financial helps (by D.D., Cheque, M.O. etc.) to **ECHO OF HIS CALL** may be sent to the address below.

Please send your **Land Phone / Mobile Phone Numbers and E.mail addresses** for updation.

**ECHO OF HIS CALL**
10, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk,
Chennai - 600 005, India
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell: (+91) 98410 71852, 95661 31858
E-mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.echoofhiscall.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS ON ONLINE ALSO**

## PLEASE PRAY FOR OUR MINISTRIES AT THE HEADQUARTERS

1. Prayer Service : 24 hours
2. **BIBLECOR -** Bible Correspondence Courses : English, Tamil & Hindi
3. **ECHO OF HIS CALL** - Monthly Magazines : English, Tamil, Malayalam, Telugu, Hindi, Kannada, Marathi, Gujarati, Bengali, Odiya, Nepali, Assamese, Punjabi, Urdu, Sinhala & Afrikaans.
4. Nehemiah Bible Colleges (Two Centres)
5. Theological Correspondence Courses: English & Tamil
6. Great Commission Partners (Network of Pastors)
7. Training Programmes
8. Crusades
9. Literature Distribution and Follow Up
10. Gospel Printing Press - Publications
11. St. Paul's Matriculation School - Village English High School
12. Sunday Schools : 8.30 a.m. & 4.00 p.m. Sunday
13. **Tamil Services : 5.30 a.m. , 7.00 a.m. & 10.00 a.m. Sunday**
14. **Malayalam Service : 2.00 p.m. Sunday**
15. **Telugu Service : 4.00 p.m. Sunday**
16. **Hindi Service : 5.00 p.m. Sunday**
17. **English & Tamil Service : 6.00 p.m. Sunday**
18. Pastors' Counselling : 4.00 p.m. Sunday
19. Women's Prayer : 5.30 p.m. Wednesday
20. Mid-week Bible study : 6.30 p.m. Wednesday
21. Men's Prayer : 7.00 p.m. Friday
22. Workers' Meeting : 6.00 p.m. Saturday
23. House Meetings : 6.30 p.m. Monday & Tuesday
24. Special Holy Communion : 5.30 a.m. 1st day of each month
25. Ministers Review Meeting : 5.30 p.m. First Saturday
26. Parents' Prayer : 4.00 p.m. First Sunday
27. Night Prayer : 9.30 p.m. Second Friday
28. Fasting Prayer : 9:30 a.m. Third Saturday
29. Holy Communion : Second Sunday Services
30. Morning Devotion : 5.30 a.m. daily
31. Staff Devotion : 9.00 a.m. daily
32. Office : 9.00 a.m. to 9.00 p.m. (except Sundays)

**The details of our Bank Accounts are given below. Please inform us the details of your remittances.**

| Bank | Branch | Name | IFSC Code No. | Account Number |
|---|---|---|---|---|
| 1. STATE BANK OF INDIA | Triplicane, Chennai -5 | S. Sam Selva Raj | SBIN 0000249 | 102329 34679 |
| 2. ICICI BANK | Anna Salai, Chennai -2 | Echo of His Call | ICIC 0006038 | 6038 05022319 |

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th JANUARY 2021**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from No.18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers** No. 18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**